ePaper

नबाम रेबिया निकालास ठाकरे गटाचे आव्हान, न्यायालयात आजही सुनावणी



वर्ष - 6 । अंक - 300 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत

- चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक: आईसाठी लेक प्रचाराच्या मैदानात
- "फडणवीसांना आत्ताच कसा साक्षात्कार झाला?"
- 14 फेब्रुवारी 'प्रेमाचा दिवस' असला तरी भारतासाठी ठरला 'काळा दिवस'



www.mahaenews.com | बुधवार , दि. 15 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महायुती की महाविकास आघाडी
# चिंचवडमध्ये 'वंचित' कोणाची?

## » डॉ. प्रकाश आंबेडकरांच्या निर्णयाकडे लक्ष : राष्ट्रवादीसह अपक्ष उमेदवारांकडून विनंती

। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून पाठिंबा मिळावा. याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी 'वंचित'कडे विनंती अर्ज पाठवला आहे. डॉ. प्रकाश आंबेडकर यांना मानणारा सुमारे ३० हजार निर्णायक मतांचा गठ्ठा चिंचवड विधानसभा मतदारसंघात आहे. त्यावर अपक्षांसह प्रमुख पक्षांचा डोळा आहे.**



काही दिवसांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीची युती झाली आहे. त्यामुळे वंचित शिवसेनेसोबत आहे. मात्र, महाविकास आघाडीमध्ये अद्याप वंचित सहभागी झालेली नाही. त्यामुळे डॉ. प्रकाश आंबेडकर कसबा आणि चिंचवड मतदार संघात काय भूमिका घेणार? याकडे चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.

वास्तविक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि वंचित बहुजन आघाडीमध्ये सर्व अलबेल आहे, असे नाही. तीन दिवसांपूर्वी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी अत्यंत सूचक वक्तव्य केले होते. "अजित पवार बंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्यास तयार आहेत. मात्र, त्यांनी हे माझे व्यक्तिगत मत आहे. माझ्या पक्षाचे तसे मत नाही, असे सांगितलेले आहे. माझ्या पक्षाला वंचित चालत नाही. मात्र मला चालते, असे अजित पवार यांनी अप्रत्यक्षपणे सांगितले," असे डॉ. आंबेडकर म्हणाले होते. याचाच अर्थ वंचित बहुजन आघाडी अद्याप महाविकास आघाडीत सहभागी झालेली नाही किंवा होईल असे वाटत नाही.

कसबा आणि चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत वंचित बहुजन आघाडी आणि डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाठिंबा दिला, तर महाविकास आघाडीत सहभागी होण्याच्या दृष्टीने पहिले सकारात्मक पाऊल असेल. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीविरोधातील राग काढण्याची भूमिका वंचितने घेतल्यास किमान १५ ते २० हजार मतांचा फटका महाविकास आघाडीला बसणार आहे,.

### राहुल कलाटेंना मदत अशक्य...

» महाविकास आघाडीतून बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा द्यावा, असे पत्र डॉ. प्रकाश आंबेडकर यांना पाठवले आहे. मात्र, राहुल कलाटे महाविकास आघाडीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून तीव्र इच्छुक होते. कलाटे यांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या मतांचे विभाजन होईल, असे चित्र आहे. त्यामुळे शिवसेना ठाकरे गटासोबत बंडखोरी केलेल्या उमेदवाराला वंचित आघाडी पाठिंबा देणार नाही. याउलट, महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मदत करण्याची भूमिका घेतली जाईल किंवा तटस्थ राहण्याचा निर्णय डॉ. प्रकाश आंबेडकर घेतील, असा दावा केला जात आहे.

> **"चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक ही प्रतिगामी शक्तींना रोखण्यासाठी महत्त्वाची आहे. वंचित बहुजन आघाडीदेखील नेहमीच प्रतिगामी शक्तींच्या विरोधात ठाम उभी राहिली आहे. त्यामुळे चिंचवड विधानसभेच्या निवडणुकीमध्ये प्रतिगामी शक्तींना नामोहरण करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांना पाठींबा द्यावा.**
>
> **- अजित गव्हाणे,**
> शहराध्यक्ष, राष्ट्रवादी.

# माझी निवडणूक मतदार संघातील महिलांच्या हाती!

## » अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विश्वास : महिला निवडणुकीत विजय खेचून आणतील

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड मतदारसंघातील पोटनिवडणूक महिलांनी हातात घेतली आहे. मतदारसंघातील प्रत्येक महिला भाजपला विजयी करून मतदानाची ताकद दाखवणार, असा विश्वास भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मंगळवारी (दि. १४) व्यक्त केला.**



अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी पिंपळेनिलख भागात घरोघरी जाऊन महिलांशी संवाद साधला. काही भागात त्यांनी कोपरा सभाही घेतल्या. यावेळी माजी नगरसेविका आरती चोंधे, सुजाता पालांडे यांच्यासह भाजप व मित्रपक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.एक महिला आपल्या पतीच्या निधनाचे दुःख बाजूला सारून अवघ्या १५ ते २० दिवसांतच आमदारकीच्या निवडणुकीला सामोरे जात असल्याचा शहरातला पहिलाच प्रसंग शहरवासीय अनुभवत आहेत.

त्यामुळे अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्याबद्दल मतदारांमध्ये प्रचंड सहानुभूती निर्माण झाल्याचे चित्र आहे. विशेषतः महिला मतदारांमध्ये भाजप व मित्रपक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्याबद्दल विशेष कुतूहल निर्माण झाल्याचे दिसत आहे.

### "'महिला स्वत:ची ताकद दाखवणार...

»'अश्विनी जगताप यांनीही माझी निवडणूक महिलांच्या हातात असल्याच्या भावना महिला मतदारांसमोर व्यक्त केल्या. माझे पती दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत मतदारसंघाच्या विकासासाठी काम केले. त्यांनी घेतलेला मतदारसंघाच्या विकासाचा वसा आणि वारसा निरंतर सुरू ठेवण्यासाठी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी महिला मतदारांना केले. महिला प्रत्येक निवडणुकीच्या केंद्रस्थानी असतात. महिला जर पेटून उठल्या तर काय करु शकतात हे दाखवून देण्याची संधी या निवडणुकीत आली आहे. महिलाच निवडणुकीच्या निकालांचे परिणाम बदलू शकतात. आताच्या पोटनिवडणुकीत माझ्यासारख्या भगिनीला भरघोस मतांनी निवडून देऊन महिला स्वतःची ताकद दाखवून देतील, असा विश्वासही अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी यावेळी व्यक्त केला.

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सेवा!

## » विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी ऑनलाइन समुपदेशकांची नियुक्ती

**।पुणे। महाईन्यूज।**



**नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भीतीने मानसिक तणावाखाली असणाऱ्या विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी राज्य मंडळाने ऑनलाइन समुपदेशनासाठी समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य मंडळातर्फे होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेत नि:शुल्क समुपदेशन मिळणार आहे.**

परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची झडती, बैठ्या पथकाची पूर्णवेळ उपस्थिती; दहावी-बारावी परीक्षांदरम्यान कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी

राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत बारावीची, तर २ ते २५ मार्च या कालावधीत दहावीची परीक्षा होणार आहे. परीक्षेच्या काळात विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भीतीने मानसिक तणावाखाली असतात. अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी राज्य मंडळाने ऑनलाइन समुपदेशनासाठी समुपदेशकांची नियुक्ती केली आहे. ७३८७४००९७०, ८३०८७५५२४१, ९८३४९५१७५२, ८४२११५०५२८, ९४०४६८२७१६, ९३७३५४६२९९, ८९९९९२३२२९, ९३२१३१५९२८, ७३८७६४७९०२, ८७६७७५३०६९ या मोबाइल क्रमांकाद्वारे सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेत विद्यार्थ्यांचे निःशुल्क समुपदेशन करण्यात येईल. मात्र मात्र विद्यार्थी, पालक यांनी परीक्षा केंद्र, बैठक व्यवस्था आणि प्रश्नपत्रिकेबाबत समुपदेशकांना विचारणा करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णयाद्वारे कॉपीमुक्त अभियानाबाबतचे निर्देश दिले. बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होणार आहे. शासनाच्या सर्व विभागांनी निवडणूक अभियानाप्रमाणे कॉपीमुक्त अभियान सामूहिकरित्या काम करून यशस्वीरित्या राबवणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा प्रशासनाने एकत्रित काम करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळेपूर्वी अर्धा तास उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. परीक्षेच्या दरम्यान बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांनी परीक्षा कक्षात प्रवेश प्रवेश करू नये. संवेदनशील परीक्षा केंद्रावर चित्रीकरण करावे.

### परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची झडती...

» राज्य मंडळातर्फे होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार आहे. त्यासाठी परीक्षा केंद्रांवर सर्व विद्यार्थ्यांची झडती घेतली जाणार असून, परीक्षेच्या आधी एक तास ते उत्तरपत्रिका जमा होईपर्यंत परीक्षा केंद्रावर महसूल विभागाचे बैठे पथक पूर्णवेळ उपस्थित राहणार आहे.

# नाना काटे यांच्याकडून गाठी भेटीचा धडाका

## » चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : प्रचारात जोरदार मुसंडी, सर्वसामान्यांचा मोठा पाठींबा



### पिंपळे गुरव परिसरात पदयात्रा: नागरिकांशी संवाद

» महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी आज (दि. १४) प्रभाग क्रमांक ४१, पिंपळे गुरव परिसरात पदयात्रा काढून नागरिकांशी संवाद साधला. सदर यात्रेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद दिल. पिंपळे गुरव परिसरातील प्रत्येक मतदार आणि घरापर्यंत पोहोचत या पदयात्रेद्वारे काटे यांनी मतदारांना अभिवादन करून मतदान करण्याचे आवाहन केले. पदयात्रेत माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, तानाजी जवळकर, शाम जगताप, राजू लोखंडे, अरुण पवार, सागर परदेशी, अतुल काशीद, विष्णू शेळके, नितीन सोनवणे, साहेबराव तुपे, बाळासाहेब पिल्लेवार, बाळासाहेब सोनवणे, सतीश चोरंबले यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेनेचे आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**।पिंपरी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी मंगळवारी (दि. १४) दिवसभर पदयात्रा, गाठीभेटी आणि बैठका घेऊन प्रचारात जोरदार आघाडी घेतली.**

आज झालेल्या पदयात्रांमध्ये महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठी हजेरी लावत एकजुटीचा प्रत्यय आणून दिला. त्यामुळे प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात तरी नाना काटे यांनी वातावरण ढवळून काढल्याचे आज दिसून आले.

महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी आज क्रांतीनगर, काशीद वस्ती, जवळकर नगर, भैरवनाथ नगर, आनंद नगर, अनंत नगर, प्रभात नगर, वैदु वस्ती, लक्ष्मी नगर, पिंपरी गुरव गावठाण, वेस्ट साईड काऊंटी, भालेकर नगर, अमृता कॉलनी, भाऊ नगर, शिवनेरी कॉलनी, काशीद नगर, देवकर पार्क, सुवर्ण पार्क आदी ठिकाणी नागरिकांच्या व कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. नाना काटे यांच्या सोबत महाविकास आघाडीतील घटक पक्ष उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, काँग्रेस व आरपीआयसह इतर पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सामील झाले होते.

मतदारसंघाच्या विविध भागांमध्ये आज दिवसभरात झालेल्या गाठीभेटी आणि पदयात्रांना नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी माता-भगिनींकडून नाना काटे यांचे औक्षण केले जात होते. आकर्षक रांगोळ्यांनी मार्ग सजविण्यात आले होते. फटाक्यांच्या आतषबाजीने परिसर दणाणून जात होता. विविध गल्ली व रस्त्यांवरून पायी चालत नाना काटे यांनी नागरिकांच्या गाठी-भेटी घेतल्या.

मतदारांकडून शुभेच्छांचा स्वीकार करीत नाना काटे यांनी त्यांची आपुलकीने विचारपूस केली. सर्वसामान्य नागरिक, मतदार आणि माता भगींनींकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे प्रचाराच्या उत्साहात भरच पडत होती. आज दिवसभाराच्या प्रचारादरम्यान 'राष्ट्रवादी पुन्हा'चीच प्रचिती आल्याने राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीतील कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला असल्याचे स्पष्ट झाले.

# लढणाऱ्या माय-लेकीसाठी, बाप बुलंद कहाणी!

## मिस यू पप्पा... : ऐश्वर्या रेणुसे- जगताप यांची हृदयस्पर्शी आदरांजली

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर आज दि. १५ फेब्रुवारी रोजी त्यांची पहिली जयंती 'स्वाभिमान सप्ताह' म्हणून साजरी होत आहे. प्रत्येक वर्षी विविध सामाजिक उपक्रम आणि भव्य- दिव्य कार्यक्रमांनी साजरा होणार वाढदिवस सोहळा यावर्षी जगताप कुटुंबीय आणि समर्थकांना करता येणार नाही.**



पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे दि. ३ जानेवारी २०२३ रोजी निधन झाले. जगताप कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. जगताप समर्थक आणि कार्यकर्त्यांसह कुटुंबीय या दुःखातून सावरले नाहीत. तोपर्यंत अल्पावधीतच चिंचवड विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणूक जाहीर झाली. भारतीय जनता पार्टीकडून आमदार जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी देण्यात आली. निवडणुकीच्या प्रचार प्रक्रियेत आपल्या आईसोबत कणखरपणे दिवंगत जगताप यांची कन्या ऐश्वर्या रेणूसे- जगताप हिसुद्धा खांद्याला खांदा लावून प्रचार करीत आहे. आपल्या वडीलांनी शहराच्या विकासासाठी दिलेले योगदान लोकांना सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

वास्तविक, चिंचवड विधानसभा मतदार संघाची निवडणूक बिनविरोध व्हावी. कारण, जगताप कुटुंबीयांमध्ये उमेदवारी देण्यात येणार असल्याचे भाजपाने जाहीर केले होते. मात्र, महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. परिणामी, दुःखाचा डोंगर पाठीवर टाकून जगताप कुटुंबीय आणि समर्थक प्रचारासाठी घरोघरी भेट देत आहेत.

दरम्यान, गेल्या ३५ वर्षांपासून शहराच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा, औद्योगिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे लक्ष्मण जगताप यांचा वाढदिवस प्रतिवर्षी दि. १५ फेब्रुवारी रोजी अत्यंत दिमाखात साजरा केला जात होता. यंदा त्यांची पहिली जयंती साजरी करावी लागेल आणि ते दुःख पचवावे लागेल. या विचाराने जगताप कुटुंबीय आणि समर्थकांचे अश्रू दाटून येत आहेत.

वडीलांच्या निधनानंतर आपल्या आईच्या प्रचारासाठी दिवंगत जगताप यांची लेक ऐश्वर्या जगताप हिने पुढाकार घेतला आहे. जगताप आजारी असताना शेवटपर्यंत त्यांच्या आरोग्याची काळजी घेणारी ही लेक आता आपल्या आईला आधार देण्याचा प्रयत्न करीत आहे. आजवरच्या निवडणुकांमध्ये लढणारे पप्पा आपल्यासोबत नाही, या कल्पनेने ऐश्वर्या आणि कुटुंबीय अक्षरशः शोकमग्न आहेत. अशातच ऐश्वार्याने आपल्या वडीलांना आदरांजली वाहण्यासाठी भावनांना मोकळी वाट करुन दिली आहे.

### आदरांजलीमध्ये ऐश्वर्या म्हणतात...

*» पप्पा मी तुमची लाडकी लेक ऐश्वर्या... आयुष्यभर मला आणि मम्मीला आपल्या साऱ्या कुटुंबाला तळहातावरल्या फोडाप्रमाणे जपणारे वडील म्हणून खरंतर तुमचा सार्थ अभिमान वाटतो. तुम्ही सर्वकाही शिकवलं. पण, तुमच्याशिवाय कसं जगायचं हेच नाही शिकवलं. तुम्ही अकालीच आम्हाला पोरकं करुन सोडून गेलात आणि चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक जाहीर झाली. तुमच्यावर प्रचंड प्रेम करणारे लाखो नागरिक डोळ्यांत आश्रू आणि उरात हुंदका घेवून मम्मीच्या पाठिशी ठामपणे उभे राहीले. त्यातच तुम्ही वरुन आम्हाला पाहताय, आम्हाला आशिर्वाद आणि लढण्याची हिम्मत देताय, असं सतत जाणवतं.. सक्रीय राजकारणामध्ये मम्मी आणि काका नेहमीच तुमच्यासोबत ठामपणे उभे होते. सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून जनतेच्या हितासाठी तुम्ही आयुष्य खर्ची घातले. अगदी शेवटच्या श्वासापर्यंत तुमची हिच तळमळ आम्ही सर्वजण पाहत होतो. हाच तुमचा वारसा चिंचवड मतदार संघातील नागरिकांच्या आशिर्वादाने व मम्मीच्या मोठ्या हिंमतीने पुढे नेईल, असा आमचा ठाम विश्वास आहे.*

*पप्पा लहानपणापासून तुम्हाला जनतेसाठी अहोरात्र झटताना पाहिले आणि मम्मीला व काकांना खंबीरपणे तुमच्या पाठिशी ठामपणे उभा राहिलेलं पाहिजे. या शहरातील प्रत्येक नागरिक माझं कुटुंब आहे, ही तुमची भावना संस्कार म्हणून तुम्ही आम्हाला दिली आणि आज पहा पप्पा तुमच्या आठवणींनी ओल्या झालेल्या लाखो डोळ्यांमध्ये आपल्या कुटुंबाबद्दलची प्रेमळ भावना दिसते. पप्पा एखाद्या मोत्याच्या माळेप्रमाणे व आपुलकीच्या धाग्यामध्ये या शहरातील माणासांना जोडून अस्सल दागिना घडवले. तुमचा खरंच सार्थ अभिमान वाटतो.*



*तुमच्या पोटी जन्म घेण्याचे भाग्य मिळाले.*

*पप्पा बघा ना कसला दिवस आहे. आज १५ फेब्रुवारी तुमचा वाढदिवस. जो दिवस ऐव्हढी वर्ष आपण सर्वजण आनंदाने, उत्साहाने साजरा करायाचो. त्यात तुमच्या वाढदिवसाला तुमची जयंती म्हणायची वेळ येईल, असे स्वप्नातही वाटले नव्हते. आज खूप भरुन आले आहे. आठवणींना बांध राहिला नाही. तुम्ही इथेच आजुबाजुला बसले आहेत, याची जाणीव सतत होते. पप्पा तुम्ही आज असायला हवे होता. तुमची खूप उणीव भासते. तुमच्यावर प्रेम करणारे आपलं पिंपरी-चिंचवड शहर तुम्हाला खूप मिस करतं. तुमच्या वाढदिवसाला जयंती कशी म्हणायची? अशी अवस्था माझ्यासह सर्वांचीच आहे.*

*पप्पा तुमचे आशीर्वाद सदैव आमच्या सोबत असूद्या... तुमच्या संस्कारांचा वारसा...आम्ही आयुष्यभर नेटाने सांभाळू...असा शब्द देते. लव यू पप्पा... वुई ऑल मीस यू...!!*

---

# हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचा भाजपाला पाठिंबा

## » अरुण देशमुख : सोसायटीधाकरकांची साथ अश्विनी जगताप यांना

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाकड परिसरात भारतीय जनता पक्षाची निवडणूक नियोजन संदर्भात कोअर समितीची महत्वाची बैठक महाराष्ट्र भाजपाचे सचिव अमित गोरखे याच्या मुख्य उपस्थितीत पार पडली. यामध्ये चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुक संदर्भातील महत्वाच्या विषयांवर निर्णय घेण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व ज्येष्ठ आणि अनुभवीदेखील उपस्थित होते.**



पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे मुख्य प्रवक्ते व भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ व अनुभवी अरुण देशमुख हे आपले मत मांडत म्हणाले की "गेली ५० वर्षे माझ्यासारखे कार्यकर्ते भारतीय जनता पक्षासाठी काम करीत आहेत.

अगदी आणीबाणीच्या काळात देखील आमच्यावर अटक होण्याची वेळ आली तरीदेखील न डगमगता आम्ही पक्षाशी एकनिष्ठ व प्रामाणिक राहिलो आणि इथून पुढे देखील भारतीय जनता पक्षासोबतच कायम राहणार आहे.

### प्रचंड बहुमताने विजयी करणार

**» यासाठी आम्ही व सर्व सोसायटीधारक मिळून भाजपच्या उमेदवार अश्विनी जगताप यांना प्रचंड बहुमताने विजयी करणार आहोत व त्यांच्या विजयामध्ये माझ्यासारख्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांचे व पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन म्हणून सोसायटीधारकांचे नक्कीच महत्वाची भूमिका असेल.**

## संपादकीय »

# निरोप कसला माझा घेतां..?

***नानासाहेबांनी घाईघाईने लालेलाल गुलाबांच्या फुलांचा एक गुच्छ उचलला आणि ते राजभवनाकडे निघाले. मन उदास झाले होते. आज आपले परमप्रिय भगतदा उत्तराखंडात परत जाणार! त्यांचे काळीज पिळवटले.***

आदरणीय भगतदांचा मायाळू हात पाठीवर कायम होता, म्हणून तर हे दिवस दिसताहेत. जीवनात असे आधारस्तंभ असावे लागतात. आधुनिक काळात त्यांनाच 'गॉडफादर' म्हणतात ना?... भगतदा हे तर महाराष्ट्राचे व्हॅलेंटाइन आहेत, असा विचार त्यांच्या मनात चमकून गेला. ते हळूचकन हसले.

विचारमग्न अवस्थेतच नानासाहेब राजभवनाकडे आले. पाठीमागचा समुद्रही दु:खाने काळवंडल्यासारखा झाला होता. राजभवनाच्या आवारात एरवी मोरबिर दिसतात. आज एक लांडोरही नव्हती. तशी सामसूमच होती. भगतदा एका पिशवीत शांतपणे पुस्तके भरत होते. नानासाहेबांकडे पाहात ते ममतेने हसले. "कब आए?आओ, आओ!"

नानासाहेबांनी जड अंत:करणाने हातातले गुलाबाचे फूल त्यांच्या हातात दिले. विनम्रपणे एक शतप्रतिशत वंदन करुन ते हात बांधून उभे राहिले. तुमच्या अचानक निवृत्तीमुळे महाराष्ट्र दु:खी झाला आहे, हे कसे सांगायचे याची शाब्दिक जुळवाजुळव चालू होती, तेवढ्यात भगतदा खुशीत म्हणाले, 'महाराष्ट्रातला माझा काळ अतिशय आनंदात गेला. मी महाराष्ट्राचा सदैव ऋणी राहीन!'

ते ऐकून नानासाहेबांच्या घशात मोठ्ठा हुंदका अडकला. ओठ किंचित बाहेर आला.

'निवृत्तीनंतर तुम्ही काय करणार आहात?' काहीतरी विचारायचे म्हणून नानासाहेबांनी पृच्छा केली.

'लेखन, वाचन, मनन आणि चिंतन! महाराष्ट्रातील अनुभवांवर एखादं पुस्तक लिहिणार आहे. मजा आली! इथं समुद्राचा शेजार आहे. आम्ही डोंगराळ भागातली माणसं! पहाटेच्या सुमाराला मी नेहमी जागा असतो. इथला सूर्योदय पाहातो! आठवतंय का, एकदा भल्या पहाटे तुम्ही आणि दादासाहेब माझ्याकडे शपथविधीला आला होता- '

'तुम्हाला जोरदार सेंडऑफ द्यायचा, सीएमसाहेबांचा बेत आहे!,' नानासाहेबांनी शिताफीने आणि कमालीच्या चपळाईने विषयाला बगल दिली. 'पहाट' असे नुसते म्हटले तरी त्यांच्या अंगावर काटाच येतो. पहाटेच्या भीतीने त्यांनी हल्ली आठच्या आत खाट सोडायची नाही, असा संकल्पच केला आहे, म्हणे. 'मलाही अनेक शुभेच्छापत्रं आली आहेत! 'आपण निघालात, थँक्यू' असं प्रत्येक शुभेच्छा संदेशात म्हटलंय!' सद्गदित होऊन भगतदा म्हणाले. त्यांच्या मनात महाराष्ट्राप्रती कृतज्ञता दाटून आली. केवढं हे महाराष्ट्राचं प्रेम! खरेच, महाराष्ट्राचे हृदय खूप खूप मोठे आहे...

# कोठे आहे सागरी महामार्ग?






पर्यटकांचे आकर्षण असलेल्या निसर्गरम्य अलिबागला नवी मुंबई आणि मुंबई महानगरीशी जोडण्याचे स्वप्न लवकरच सत्यात येईल. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रलंबित रेवस-रेड्डी या सागरी महामार्गावरील धरमतर खाडीवरील रेवस ते उरणनजीकच्या करंजा बंदराला जोडणारा सागरी पूल अखेर मार्गी लागला हे स्वागतार्ह आहे. रस्ते विकास महामंडळ या पुलावर ८९७ कोटी ७० लाख रुपये खर्च करणार आहे. रेवस आणि करंजाला जोडणारा चार पदरी खाडी पूल बांधण्याची निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. तो पूर्ण झाल्यावर प्रवाशांचा वेळ आणि इंधनाची खूप बचत होणार आहे.

या पुलामुळे अलिबाग थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह जेएनपीटीला जोडले जाणार आहे. यात अलिबाग आणि नवी मुंबई व मुंबईचे अंतर कमी होऊन यात प्रवाशांचा वेळ, पैसा, श्रम याच्यासह प्रदूषण कमी होऊन इंधनाची बचत होणार आहे. सुमारे ४० वर्षांनंतर बॅ. अंतुले यांचे स्वप्न सत्यात येईल.गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ या राज्यांचा चेहरामोहरा २१५० किलोमीटर लांबीच्या सागरी महामार्गामुळे बदलू शकेल. महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यातील झाई गावापासून सुरू होणारा हा सागरी महामार्ग रेवस, रेवदंडा, दाभोळ, जयगड, मालवणमार्गे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सातार्डे गावातून गोव्यात शिरेल. यातील दुर्दैवाचा भाग असा, की महाराष्ट्र सोडला तर पश्चिम किनारपट्टीवरील सर्व राज्यांतील सागरी महामार्ग तयार आहेत. पणजीपासून थेट कोचीपर्यंत ७३१ कि.मी. लांबीचा सागरी महामार्ग सलग किनारपट्टीनेच जातो. प्रवासात उजव्या दिशेला सतत समुद्राचे विलोभनीय दर्शन होते.

एकूण ४२ खाड्यांनी व्यापलेल्या डोंगराळ प्रदेशाच्या कोकणपट्टीतून जाणारा रेवस-रेड्डी सागरी महामार्गामुळे मुंबईचे सध्याचे अंतर १०५ कि.मी.ने कमी होऊन प्रवासाची वेळ किमान एक-दीड तासांनी कमी होईल. कोकणातील बहुतांशी पर्यटन केंद्रे किनारपट्टीवर असल्याने पर्यटन विकासाला गती मिळून मोठ्या प्रमाणावर पर्यटक कोकणात उतरतील. नितांत सुंदर समुद्रकिनाऱ्याचे जगभरच्या पर्यटकांच्या दृष्टीने मार्केटिंग करता येईल. आंबा उत्पादन व मच्छीमारी व्यवसायाला अधिक गती मिळेल. कोकणामध्ये सध्या बंदर विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असल्याने जलद व सुलभ वाहतुकीस चांगला पर्याय उपलब्ध होईल. तटरक्षक दलाचा विमानतळ रत्नागिरीतच असल्याने, राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने सागरी महामार्गाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. मुखाजवळ खाडीची रुंदी अधिक असल्याने पूल खाडीच्या मुखापासून सात-आठ कि.मी. दूर केल्यास खर्च कमी येतो. किनारपट्टीलगतच्या गावात दाट लोकवस्ती असल्याने रस्ते काढणे कठीण जाते. दिघी, आगरदांडा, बाणकोट, जयगड व दाभोळ हे पूल 'नाबार्ड'कडे प्रस्तावित आहेत. एकूण १८३७ मीटर लांबीचा बाणकोट-बांगमांडला पूल २०१३ मध्ये 'नाबार्ड'कडून अर्थसाह्य मिळूनदेखील रखडला आहे. तसेच जयगडऐवजी १० कि.मी. अंतरावरील कुंडली (जांभारी) पूल प्रस्तावित आहे. परंतु जयगडमध्ये पूल बांधणे सर्वार्थाने योग्य आहे; तसेच विजयदुर्गऐवजी सागवे-आंबेरी पूल पूर्ण झाला आहे.

# सर्वसमावेशक विकासाची संधी!

**जी-ट्वेंटी गटाचे अध्यक्षपद भारताकडे येणे ही मोठी संधी आहे. वसुधैव कुटुम्बकम् हे ब्रीद, तसेच पिढ्यान्पिढ्या राबवली जाणारी शाश्वत विकासाची संकल्पना या गोष्टी या निमित्ताने भारताला आर्थिक संदर्भात जगापुढे आणता येणार आहेत.**

येत्या १ डिसेंबर रोजी, म्हणजे आतापासून एका महिन्यापेक्षाही कमी कालावधीत भारत जी-ट्वेंटी गटाचे अध्यक्षपद स्वीकारणार आहे. त्यामुळे विकसनशील देशांच्या समस्या आणि त्यांचे प्राधान्यक्रम याबाबत भूमिका मांडण्याची एक प्रकारे जबाबदारी भारताकडे येणार आहे. या आंतरसरकारी व्यासपीठाच्या गेल्या १४ वर्षांच्या इतिहासात प्रथमच उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचे नेतृत्व भारताकडे येणार आहे. इंडोनेशिया-भारत-ब्राझील हा उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा गट असून भारत त्याच्या केंद्रस्थानी आहे. सुमारे १.४ अब्ज लोकसंख्येसह भारत ही जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे समकालीन वास्तव परिस्थितीबाबत जगाला योग्य दिशा दाखवण्यासाठी भारताकडे पुरेशी आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षमता आहे.

जी-ट्वेंटी गटाचे अध्यक्षपद भूषवण्यातून भारताला अनेक गोष्टी साध्य करता येतील. महिला सक्षमीकरण, डिजिटल सार्वजनिक



पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाधारित विकास आणि पर्यावरणस्नेही जीवनशैली (एलआयएफई – अर्थात लाइफस्टाइल फॉर एन्व्हरायर्नमेंट) यावर लक्ष केंद्रित करता येईल. सर्वसमावेशक, न्याय्य शाश्वत विकास ही तत्त्वे समोर ठेवून निश्चित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भातील संकल्पना मांडणे, त्या अमलात आणणे यासाठी भारताला मिळालेली ही मोठी संधी आहे.

मात्र, वाढत्या प्रमाणात ध्रुवीकरण होत असलेल्या सध्याच्या जागतिक व्यवस्थेत या प्राधान्यक्रमांना अधिक वाव मिळवून देणे हे काही लहानसहान काम नाही. भारताकडे अध्यक्षपदाची ही जबाबदारी आलेली असतानाच्या काळात रशिया-युक्रेन संघर्ष सुरू आहे. त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि सार्वत्रिक आर्थिक मंदीपासून ते विकसनशील देशांना सतावणाऱ्या मोठ्या कर्ज संकटांपर्यंत जगाला ग्रासून टाकणाऱ्या इतर अनेक समस्या उभ्या आहेत. जागतिक महामारीच्या निवारणासाठी आवश्यक असलेल्या अधिक तातडीच्या आपत्ती निवारण उपाययोजना कराव्या लागल्यामुळे, कोविड-१९ च्या महासाथीनेदेखील गेली अनेक दशके सुरू असलेली विकास प्रक्रिया मोठ्या प्रमाणात विस्कळीत केली आहे. या आपत्तीचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकास ध्येयेदेखील काही प्रमाणात दृष्टिआड करावी लागली आहेत. जागतिक पातळीवर एकमेकांशी जोडून घेणारी भारताने मांडलेली शाश्वत विकासाची संकल्पना, चक्रीय अर्थव्यवस्था आणि सामायिक जबाबदारी ही या घडीला काळाची गरज आहे.आपल्या जी-ट्वेंटी गटाच्या अध्यक्षपदाच्या कालावधीत भारत 'वसुधैव कुटुम्बकम' म्हणजेच 'संपूर्ण विश्व हे एकच कुटुंब आहे, त्याचे भविष्य एकच आहे'

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# “फडणवीसांना आत्ताच साक्षात्कार झाला?”

## शपथविधीवरील विधानानंतर पटोलेंचा सवाल; म्हणाले “...ही भाजपाची खेळी!”

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**अजित पवारांबरोबर २०१९ मध्ये झालेला शपथविधी हा शरद पवारांशी चर्चा झाल्यानंतरच झाला होता, असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल एका कार्यक्रमात बोलताना केला होता. यावरून आता विविध राजकीय चर्चांना उधाण आले असताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी देंवेंद्र फडणवीसांवर टीका केली आहे. फडणवीसांना साडेतीन वर्षांनंतर या गोष्टीचा साक्षातकार कसा झाला? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे**





“देवेंद्र फडणवीस यांच्या दाव्यावर मी जास्त काही बोलणार नाही. मात्र, या घटनेला साडेतीन वर्ष झाल्यानंतर फडणवीस यांना आताच त्याचा साक्षात्कार कसा झाला? ते आधी का बोलले नाहीत? अशी प्रतिक्रिया नाना पटोले यांनी दिली.

तसेच काँग्रेससाठी पहाटेचा शपथविधी महत्त्वाचा नाही, तर महागाई, बेरोजगारी, शेतकरी व जनतेचे मुलभूत प्रश्न महत्त्वाचे आहेत”, असेही ते म्हणाले.

### “आमच्यासाठी जनतेचे प्रश्न महत्त्वाचे”

“महाराष्ट्रात आज शेतकऱ्यांची काय अवस्था झाली आहे? कापूस, कांदा, सोयाबीनचे दर घसरले आहेत आणि केंद्र सरकार कापसाच्या गाठी आयात करत आहे. महागाई वाढली आहे. बेरोजगारी वाढली आहे. शेतकरी दररोज आत्महत्या करत आहेत. गरिबांच्या मुलांचा शिक्षणाचा प्रश्न आहे. राज्यात कायदा सुव्यवस्था नाही. आमदार सुरक्षित नाहीत. जनता सुरक्षित नाही आणि निवडणुकीच्या तोंडावर काहीतरी फुसकीसोडून लोकांना मुळ मुद्द्यांपासून दुसरीकडे वळवायचे, ही भाजपाची खेळी आहे”, असा आरोपही त्यांनी केला.

### ''राज्यात सध्या असंवैधानिक सरकार”

पुढे बोलताना, “२०१९ साली काय झालं, यावर आज चर्चा करण्यात काहीही अर्थ नाही. या घटनेला खूप कालावधी लोटला आहे. त्यावर चर्चा करण्याची ही वेळ नाही. मुळात देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ साली काय झाले होते, तेही सांगावे. त्यावेळी शिवसेनेचे एकनाथ शिंदे विरोधी पक्षनेते झाले होते. सत्तेसाठी भाजपा काहीही करते. आताही राज्यात असंवैधानिक सरकार आहे”, अशी टीकाही त्यांनी केली.

# 'उडत्या पाखरांना...', सत्यजीत तांबेंनी दाखवली पक्ष सोडण्याची तयारी?

## सत्यजीत तांबे यांना स्वगृही येण्याचे आवाहन

।मुंबई। महाईन्यूज ।

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी जाहीरसभेत अप्रत्यक्ष बंड केलेल्या सत्यजीत तांबे यांना स्वगृही येण्याचे आवाहन केले. मात्र, सत्यजीत तांबे यांनी सूचक ट्विट केले आहे. उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी. असं सत्यजीत तांबे यांनी ट्विट केले आहे. त्यांच्या या ट्विटनंतर तांबे यांनी पक्ष सोडण्याची तयारी दाखवली आहे. अशी उलटसुलट चर्चा रंगली आहे.**





काल संगमनेर येथे बोलताना थोरात यांनी सत्यजीतची टीम काँग्रेसमध्ये राहिली आहे. पण तो एकटा राहिला आहे. आता तुलाही करमणार नाही. असं वक्तव्य केलं. त्यानंतर राजकीय वर्तुळात तांबे पुन्हा स्वगृही परतणार असल्याच्या चर्चेला उधाण आलं.

दरम्यान, या चर्चेला पुर्णविराम देत तांबे यांनी सूचक ट्विट केले आहे. 'उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी...नजरेत सदा नवी दिशा असावी । घरट्याचे काय बांधता येईल केव्हाही... क्षितिजा पलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी ।' अशा आशयाचे ट्विट सत्यजीत तांबे यांनी केलं आहे.

तांबे यांच्या ट्विटनंतर राजकीय गोटात अनेक तर्क वितर्क लावण्यात येत आहेत. सत्यजीत तांबे यांनी पक्ष सोडण्याची तयारी दाखवली आहे. अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### काय म्हणाले थोरात?

**राज्यात भारत जोडो यात्रा आलेली तेव्हा सत्यजीत तांबे यांनी खुप मेहनत घेतली. सत्यजीतची टीम काँग्रेसमध्ये राहिली आहे. पण तो एकटा राहिला आहे. आता तुलाही करमणार नाही, त्यांनाही करमणार नाही आणि काँग्रेसलाही करमणार नाही. असं विधान केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात सत्यजीत हे काँग्रेसमध्ये पुनरागमन करणार का? असा सवाल उपस्थित झाला आहे. तसेच, माझा हात नीट असता तर तांत्रिक चूकही झाली नसती. मी स्वतः नाशिकमध्ये राहिलो असतो, ती चूक होऊ दिली नसती. परंतू या सगळ्यामधून माझ्या मताची दिल्लीने दखल घेतली आहे. काहीही झाले तरी पक्षांतर्गत गोष्टी आम्ही पक्षातच सोडवू. असं वक्तव्य थोरात यांनी यावेळी केलं.** देशात कुठेही नसेल एवढा जनसंपर्क या पाच जिल्ह्यात तांबे यांचा आहे. मी नेहमी त्यांना म्हणतो की, मला तमुची गाडी आणि ड्रायव्हरचे कौतुक वाटते. सुधीर तांबे यांनी पाचही जिल्ह्यात जिव्हाळ्याचे नाते तयार केले, हे नाते सत्यजीत तू विसरू नको, असा सल्ला थोरात यांनी यावेळी सत्यजीत यांनी दिला.

# राज्यात लागू होणार 'पीएमश्री योजना'

## राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मोठा निर्णय!

। मुंबई ।महाईन्यूज ।



केंद्र सरकारची पीएमश्री योजना ही आता महाराष्ट्रात देखील लागू होणार आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शाळांच्या अद्यवतीकरणासाठी हा निर्णय महत्वाचा ठरणार आहे.

या येजनेअंतर्गत शाळेतील नवीन तंत्रज्ञान, स्मार्ट क्लास, खेळ, ग्रंथालय अशा आधिनिक सोयी सुविधा अद्यावत करण्यात येणार आहेत.विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि साक्षरता वाढवणं, विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना या योजनेअंतर्गत सुचवल्या जातील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या शाळांच्या माध्यमातून अंमलात आणले जाईल.सप्टेंबर २०२२ मध्ये केंद्राने पंतप्रधान स्कूल फॉर रायजींग इंडीया ही योजना सुरू केली आहे. देशभरातील १४,५९७ शाळा या अंतर्गत सुरू करण्यात येणार आहेत.राज्यात याची अंमलबजावणी हवी यासाठी आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीय निर्णय घेण्यात आला. टप्प्याटप्प्याने या शाळा सुरू करण्यात येतील.

### PM SHRI योजना काय आहे?

**प्रधानमंत्री स्कूल फॉर रायझिंग इंडिया (PM-SHRI) ही केंद्र सरकारची एक योजना आहे ज्यामध्ये देशातील सध्याच्या शाळांना मॉडेल स्कूल म्हणून विकसित केले जाईल . देशातील १४,५९७ शाळा या योजनेशी जोडल्या जातील .**

# 14 फेब्रुवारी 'प्रेमाचा दिवस'

# भारतासाठी ठरला 'काळा दिवस'!

## देशभरातून शहीदांना श्रद्धांजली अर्पण

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदादेखील 14 फेब्रुवारी रोजी संपूर्ण जगभरातील लोक प्रेमाचा दिवस म्हणजेच 'व्हेलेंटाईन डे' साजरा करत आहेत. मात्र, भारतात 2019 पासून या दिवसाची नोंद काळा दिवस म्हणून करण्यात आली. 14 फेब्रुवारी 2019 या दिवशी पुलवामा येथे भारतीय जवानांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात CRPF च्या 40 जवानांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. आज याचं काळ्या दिवसाला एकूण 4 वर्ष पूर्ण झाली असून संपूर्ण देशभरातून शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.**

14 फेब्रुवारी 2019 रोजी सकाळी जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरून सुमारे 2500 जवानांना घेऊन सीआरपीएफचा ताफा बसमधून जात होता. पुलवामा येथे पोहोचताच CRPF च्या बसवर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात 40 CRPF जवान जागीच शहीद झाले. पुलवामा हल्ला भारतातील मोठ्या दहशतवादी हल्ल्यांपैकी एक मानला जातो. या घटनेने संपूर्ण देश सुन्न झाला होता. या हल्ल्यामागे पाकिस्तानातील जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा हात होता. दरम्यान, त्यानंतर या हल्ल्याचे प्रत्युत्तर देत भारतीय लष्कराने देखील पाकिस्तानाच्या अंतर्गत येणाऱ्या काश्मिरमध्ये सर्जिकल स्ट्राइक केला होता. भारताने 26 फेब्रुवारीला बालाकोट एअर स्ट्राइक करून जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांचा खात्मा केला.

### भारतात 14 फेब्रुवारी मानला जातो 'काळा दिवस'

दरम्यान, 14 फेब्रुवारी संपूर्ण जगासाठी जरी प्रेमाचा दिवस असला तरी 2019 पासून संपूर्ण भारतात 14 फेब्रुवारी हा काळादिवस मानला जातो. या दिवशी पुलवामा हल्ल्यात शहीद जवानांना श्रद्धांजली दिली जाते.



---

# बीबीसीवरील प्राप्तिकराच्या छापेमारीवरून विरोधक आक्रमक

## विरोधी पक्षांनी केली मोदी सरकारवर जोरदार

।।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

कथित करचुकवेगिरीच्या तपासाअंतर्गत प्राप्तिकर विभागाने दिल्ली आणि मुंबईतील बीबीसी कार्यालयात 'सर्व्हे ऑपरेशन' केले. मात्र, 2002च्या गुजरात दंगलीसंदर्भात बीबीसीने केलेल्या माहितीपटाच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई झाल्याने राजकीयदृष्ट्या त्याचे पडसाद उमटले आहेत. काँग्रेससह प्रमुख विरोधी पक्षांनी यावरून काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे.

बीबीसीच्या कार्यालयावरील आयटी छापे उद्वेगजनक असून मोदी सरकार टीकेला घाबरत असल्याचे त्यातून दिसत आहे. या दडपशाहीच्या प्रकाराचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. ही लोकशाहीविरोधी हुकूमशाही वृत्ती यापुढी चालू शकत नाही, असे ट्वीट काँग्रेस खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी म्हटले आहे. तर, '56 इंचाच्या छातीची व्यक्ती (पंतप्रधान नरेंद्र मोदी) किती भित्री आहे, हे आज पुन्हा एकदा स्पष्ट झाले,' असे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. याशिवाय, 'बीबीसीवर प्राप्तिकर विभागातर्फे छापा टाकून मोदी सरकार जगाला आपल्या खऱ्या चेहऱ्याचे दर्शन स्वतःच घडवत आहे आणि बीबीसीची भूमिका योग्य होती हेही अधोरेखित करत आहे, असे काँग्रेस प्रदेश सरचिटणीस सचिन सावंत यांनी म्हटले आहे.




### बीबीसीची भूमिका योग्य होती...

**बीबीसीच्या कार्यालयावरील आयटी छापे उद्वेगजनक असून मोदी सरकार टीकेला घाबरत असल्याचे त्यातून दिसत आहे. या दडपशाहीच्या प्रकाराचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. ही लोकशाहीविरोधी हुकूमशाही वृत्ती यापुढी चालू शकत नाही, असे ट्वीट काँग्रेस खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी म्हटले आहे. तर, '56 इंचाच्या छातीची व्यक्ती (पंतप्रधान नरेंद्र मोदी) किती भित्री आहे, हे आज पुन्हा एकदा स्पष्ट झाले,' असे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. याशिवाय, 'बीबीसीवर प्राप्तिकर विभागातर्फे छापा टाकून मोदी सरकार जगाला आपल्या खऱ्या चेहऱ्याचे दर्शन स्वतःच घडवत आहे आणि बीबीसीची भूमिका योग्य होती हेही अधोरेखित करत आहे, असे काँग्रेस प्रदेश सरचिटणीस सचिन सावंत यांनी म्हटले आहे.**

---

# शिवसेना सत्तासंघर्ष : बुधवारी सर्वोच्च न्यायालयात नियमितपणे सुनावणी

## बुधवारी शिंदे गटाचे वकील हरीश साळवे युक्तीवाद करणार

।मुंबई। महाईन्यूज ।

राज्यातील सत्तासंघर्ष आणि शिवसेना फुटीप्रकरणी आज ( १४ फेब्रुवारी ) सर्वोच्च न्यायालयात पाच सदस्यीय घटनापीठापुढे सुनावणी पार पडली. उद्या ( १५ फ्रेब्रुवारी ) पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. आजच्या सुनावणीत शिवसेनेचे दरम्यान, आज पाच सदस्यीय घटनापाठीपुढे झालेल्या सुनावणीत शिवसेनेचे ( ठाकरे गट ) वकील कपिल सिब्बल, वकील अभिषेक मनु सिंघवी आणि वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवाद केला आहे. तर, बुधवारी होणाऱ्या सुनावणीत शिंदे गटाचे वकील हरीश साळवे हे युक्तिवाद करणार आहे. शिंदे गटाकडून नबाम रेबिया प्रकरणाचा सातत्याने दाखला देण्यात येत आहे.

न्यायालयात युक्तीवाद करताना कपिल सिब्बल यांनी म्हटलं की, "नबाम रेबिया प्रकरणाचं पुनरावलोकन करण्याची गरज आहे. नबाम रेबिया प्रकरणात अध्यक्षांना पदमुक्तीची नोटीस बजावल्यानंतर ते अपात्रतेचा निर्णय घेऊ शकत नाहीत. विधानसभा अधिवेशनावेळीच अध्यक्षांच्या पदमुक्तीचा प्रस्ताव मांडता येतो. तसेच, राजकीय सभ्यता राखण्यासाठी दहावी अनुसूची देण्यात आली आहे, मात्र, दहाव्या अनुसूचीचा गैरवापर होतो की काय अशी शंका येते," असे मुद्दे कपिल सिब्बल यांनी मांडले आहे.



### "नबाम रेबिया प्रकरण आणि महाराष्ट्राचं सत्तासंघर्ष..."

**सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडल्यानंतर शिवसेना खासदार अनिल देसाई यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं की, "आमदारांची अपात्रता आणि अन्य विषयांवर चर्चा झाली. आमदार पक्ष सोडून सुरुत, गुवाहाटील गेले. पक्षाने बोलण्यात आलेल्या बैठकीत गैरहजर राहिले; याचा अर्थ तुम्ही पक्षाची सदस्यता स्वतःच सोडून दिली आहे. तिथेच अपात्रता लागते. तसेच, अरुणाचल प्रदेश आणि नबाम रेबिया प्रकरण आणि महाराष्ट्राचं सत्तासंघर्ष याच्यात काही साम्य नाही. हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावं लागेल," असं अनिल देसाईंनी म्हटलं.( ठाकरे गट ) वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तीवाद केला. तसेच, नबाम रेबिया प्रकरणावर महत्वाचं भाष्य केलं आहे.**

# सिद्धार्थ-कियाराच्या रिसेप्शन पार्टीत चर्चा आलिया भट्टच्या शिमरी साडीची



बॉलिवूडमधील नवं जोडपं म्हणजे सिद्धार्थ मल्होत्रा -कियारा अडवाणी, या दोघांचा नुकताच शाही विवाह सोहळा राजस्थानमध्ये पार पडला. मात्र त्यांनी काल रविवारी मुंबईत रिसेप्शन ठेवले होते. संपूर्ण बॉलिवूडने या रिसेप्शनला हजेरी लावली. रोहित शेट्टी, अजय देवगण, काजोल, अंबानी दाम्पत्य, अभिषेक बच्चन, आशुतोष गोवारीकर अशा कित्येक मंडळींनी हजेरी लावून नव्या जोडप्याला शुभेच्छा दिल्या. अभिनेत्री आलिया भट्ट ने देखील हजेरी लावली. विशेष म्हणजे सिद्धार्थ मल्होत्राची ती एक्स गर्लफ्रेंड आहे. मात्र चर्चा वेगळ्याच कारणाने रंगली आहे.

सिद्धार्थ-कियाराच्या रिसेप्शनमध्ये आलियाने शिमरी साडी परिधान केली होती. आलिया या पार्टीमध्ये एकदम साध्या लुकमध्ये दिसली. मात्र तिच्या साडीने सगळ्यांचे लक्ष वेधले. कारण या साडीची किंमत काही लाखांमध्ये आहे. फ्री प्रेस जर्नलने फॅशन डिझायनर सावन गांधी यांच्याशी संपर्क साधला ज्यांनी या साडीची आलियासाठी व्यवस्था केली होती.

# अखेर प्राजक्ता माळीनं सांगितलं तिचं रिलेशनशीप स्टेट्स..चाहत्यांनी केला कमेंट्सचा वर्षाव



व्हॅलेंटाईन डे निमित्तानं आज जिकडे तिकडे प्रेमाला बहर आलेला दिसत आहे. सोशल मीडियावर हा बहर नेटकऱ्यांपासून सेलिब्रिटीपर्यंत साऱ्यांच्या पोस्टच्या रुपात समोर आलेला दिसत आहे. आता सर्वसामान्य लोकांना सेलिब्रिटींच्या आयुष्यात काय चाललं आहे हे जाणून घेण्यात नेहमीच इंट्रेस्ट असतो.

त्यात खासकरुन कोणता अभिनेता किंवा अभिनेत्री कोणाला डेट करतायत याबाबत तर जरा अधिकच उत्सुकता असते सर्वांना. त्यामुळे आजच्या प्राजक्ता माळीच्या व्हॅलेंटाईन स्पेशल पोस्टला म्हणूनच वजन आलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून प्राजक्ता माळीच्या रिलेशनशीपच्या अनेक चर्चा कानावर पडत आहे. तिचं प्रेम ते तिचं ब्रेकअप सारं काही. आता झालं गेलं सगळं जुनं झालं पण सध्या मॅडम सिंगल आहेत का हा प्रश्न सगळ्यांनाच होता.

त्यामुळे आज व्हॅलेंटाईन डे निमित्तानं प्राजक्तानं पोस्ट करत आपल्या रिलेशनशीप स्टेट्स विषयी पोस्ट करत जाहीर करून टाकलं आहे.

प्राजक्ता माळीनं एक पोस्ट केलीय..जी खरंतर एक फोटो पोस्ट आहे. लाल रंगाच्या साडीत प्राजक्तानं छान छान फोटो पोस्ट करत त्याला कॅप्शन देत आपलं रिलेशनशीप स्टेट्स जाहीर करून टाकलं आहे.प्राजक्तानं आपण सिंगल असल्याचं जाहीर केलं आहे. आता या सोशल मीडियावरच्या खास सेलिब्रिटीच्या पोस्टवर

# भूमी तुझं काय चाललंय आम्हाला माहितीये ?

सध्या मनोरंजन विश्वात लव्ह कपल सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी यांचीच चर्चा आहे. यादोघांनी 7 फेब्रुवारीला लग्न केले आणि 12 फेब्रुवारीला त्यांनी मुंबईत एक मोठी रिसेप्शन पार्टी दिली. यामध्ये बी-टाऊनचे सर्व कलाकार पोहोचले. याचे बरेच व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरलही होत आहेत.

यात अनेक कलाकारांच्या जोड्याही दिसल्या. मात्र त्याचवेळी भूमी पेडणेकर ही वेगळ्याच मुडमध्ये दिसली. तिन या व्हिडिओत एकाला गुपचूप लिप किस केलं हे सर्व काही कॅमेऱ्यात कैद झालं आणि आता हा व्हिडिओ सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्राच्या रिसेप्शन पार्टीत भूमी पेडणेकर तिच्याच दुनियेत दिसली. त्याचं असं झालं की, पार्टीनंतर सगळ्यांप्रमाणे तीही तिच्या घरी निघाली होती. ती गाडीत बसायला गेल्यावर पापाराझींनी तिला घेरलं.

त्याचवेळी भूमी पेडणेकरसोबत निळ्या कुर्त्यातील एक व्यक्तीही दिसली. यानंतर बॉडीगार्डने पापाराझीच्या कॅमेऱ्याला हात लावण्याचाही प्रयत्न केला जेणेकरून तो काहीही क्लिक करु नये. पण असं काही झालं नाही. भूमी गाडीत बसली आणि तितक्यात त्या व्यक्तीचे आणि भुमीला लिपकिस केलं. तेच कॅमेऱ्यात कैद झाले. यानंतर हा व्हिडिओ व्हायरल झाला.

भूमी पेडणेकरने ज्याला लिपकिस केलं, त्याचं नाव यश कटारिया आहे. तो बिझनेसमॅन आहे. या दोघांचे एकत्र अनेक फोटोही समोर आले आहेत. यश हा भूमीचा बॉयफ्रेंड असल्याचंही म्हटलं जातं. हे दोघे रिलेशनशिपमध्ये आहेत की नाही हे माहीत नसले तरी ज्या पद्धतीने हा व्हिडिओ समोर आला आहे. त्यावरुन दोघांमध्ये नक्कीच काहीतरी शिजल्याचं दिसतयं.



# “मेरे बस में नहीं अब...” पाठकबाईंची राणादासाठी रोमँटिक पोस्ट

अक्षया देवधर आणि हार्दिक जोशी ही टीव्हीवरील लोकप्रिय जोडी काही महिन्यांपूर्वीच लग्नाच्या बेडीत अडकली आहे. या दोघांच्या लग्नाची सोशल मीडियावरही बरीच चर्चा झाली. दोघंही सोशल मीडियावर बरेच सक्रिय असतात आणि नेहमीच एकमेकांवरील प्रेम व्यक्त करताना दिसतात. आज व्हॅलेंटाइन डेच्या निमित्ताने पाठकबाई म्हणजेच अक्षय देवधरने एक रोमँटिक पोस्ट शेअर केली आहे. जी सोशल मीडियावर खूप चर्चेत आहे.

अक्षय देवधर आणि हार्दिक जोशी मराठी मनोरंजनसृष्टीतील सर्वाधिक चर्चेत असणारी जोडी आहे. दोघंही अनेकदा एकमेकांच्या सोशल मीडिया पोस्टवर कमेंट करताना दिसतात. आताही अक्षया देवधरने तिच्या इन्स्टाग्रामवर हार्दिकबरोबरचा सुंदर रोमँटिक फोटो शेअर केला आहे. या फोटोसह तिने खूपच रोमँटिक कॅप्शनही दिलं आहे. अक्षयाच्या या पोस्टवर हार्दिकने कमेंट केली आहे.अक्षया देवधरने इन्स्टाग्रामवर हार्दिक बरोबरचा फोटो शेअर करताना एक हिंदी शायरी पोस्ट केली आहे. तिने लिहिलं, “मेरे बस में नहीं अब हाल-ए-दिल बयां करना, बस ये समझ लो लफ्ज कम मोहब्बत ज्यादा है!” अक्षयाच्या या फोटोवर कमेंट करताना हार्दिकनेही ‘हार्ट’ इमोजी पोस्ट करत प्रेम व्यक्त केलं आहे. अक्षयची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली असून त्यावर कमेंट्सचा पाऊस पडला आहे.

दरम्यान अक्षया देवधर आणि हार्दिक जोशी डिसेंबर २०२२ मध्ये लग्नाच्या बेडीत अडकले. या दोघांनी ‘तुझ्यात जीव रंगला’ या झी मराठीवरील मालिकेत एकत्र काम केलं होतं आणि याच मालिकेच्या सेटवर झालेली या दोघांची मैत्री पुढे प्रेमात बदलली. मात्र याबद्दल या दोघांनी कधीच जाहीर भाष्य केलं नाही. अखेर मे २०२२ रोजी त्यांचा साखरपुडा झाला त्यावेळी चाहत्यांना पहिल्यांदा त्यांच्या डेटिंगबद्दल कळलं होतं. रील



# न्यूझीलंड विश्वचषकातून बाहेर!

## दक्षिण आफ्रिकेने किवी संघाला 67 धावांत गुंडाळत 65 धावांनी विजय मिळवला

। मुंबई।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयसीसी महिला टी-20 विश्वचषक स्पर्धेतील गट सामन्यात सोमवारी दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंड संघावर 67 धावांनी विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेला पहिल्या सामन्यात श्रीलंकेकडून पराभव स्वीकारावा लागला होता. त्याचवेळी न्यूझीलंडला सलग दुसऱ्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. किवी संघ विश्वचषकातून बाहेर होण्याच्या मार्गावर पोहोचला आहे.**



दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाच्या 3 विकेट 46 धावांत पडल्या. ट्रायनसह कर्णधारने डाव सांभाळला. कर्णधारने 17 चेंडूंत 4 चौकारांसह 22 धावा केल्या. ट्रायॉनने 34 चेंडूत 6 चौकारांसह 40 धावांची खेळी खेळली. नादिन डी क्लर्कने 26 चेंडूत 28 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेने 20 षटकांत 6 गडी गमावून 132 धावा केल्या.लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात खूपच खराब झाली. सलामीवीर बर्नाडाइन आणि सुझी बेट्स सलग दुसऱ्या सामन्यात खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतले.

10व्या षटकात न्यूझीलंडची धावसंख्या 31 धावा होती आणि अर्धा संघ बाद झाला होता. सर्वाधिक धावा कर्णधार सोफी डिव्हाईनने केल्या. न्यूझीलंडच्या फलंदाजीची अवस्था अशी होती की 8 फलंदाज मिळून 27 धावा करू शकले. दक्षिण आफ्रिकेने किवी संघाला 67 धावांत गुंडाळत 65 धावांनी विजय मिळवला. विश्वचषकात न्यूझीलंडची ही सर्वात कमी धावसंख्या आहे.

# बीसीसीआय जाम खुश!

## डिसेंबर 2017 नंतर दिल्लीत पहिली कसोटी खेळली जाणार

।दुबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीची दुसरी कसोटी शुक्रवारपासून नवी दिल्लीत सुरू होणार आहे, ती खचाखच भरलेल्या स्टेडियममध्ये खेळली जाणार आहे. डिसेंबर 2017 नंतर दिल्लीत पहिली कसोटी खेळली जात आहे.

चार सामन्यांच्या मालिकेत भारताने नागपुरातील पहिली कसोटी तीन दिवसांत जिंकून 1-0 अशी आघाडी घेतली. 'तिकिटे विकली गेली आहेत आणि आम्हाला पूर्ण घर मिळण्याची अपेक्षा आहे. दिल्लीत बऱ्याच काळानंतर कसोटी सामना खेळला जात असल्याने खूप उत्सुकता आहे.' असे डीडीसीएचे सहसचिव राजन मनचंदा यांनी मंगळवारी पीटीआयला सांगितले.

अरुण जेटली स्टेडियमची आसनक्षमता 40,000 आहे. एकूण 24,000 तिकिटे विक्रीसाठी ठेवण्यात आली होती तर 8000 डीडीसीए सदस्यांमध्ये वितरीत करण्यात आली होती. ही गोष्ट सर्वसामान्य आहे. उर्वरित तिकिटे ही सामना पाहण्यासाठी उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांसाठी वापरल्या जातील.

सामन्यासाठी सुरक्षा पुरविणाऱ्या कुटुंबांसाठी स्टँडचा एक भाग देखील राखीव आहे. मालिकेतील पहिल्या नागपूर कसोटीत देखील चांगली गर्दी जमली होती. भारताने ज्याप्रकारे खेळ केला त्यामुळे दिल्ली कसोटीत देखील गर्दी होईल. कसोटी क्रिकेटसाठी ही चांगली गोष्ट आहे.

### तीन दिवसांत जिंकून 1-0 अशी आघाडी

**चार सामन्यांच्या मालिकेत भारताने नागपुरातील पहिली कसोटी तीन दिवसांत जिंकून 1-0 अशी आघाडी घेतली. 'तिकिटे विकली गेली आहेत आणि आम्हाला पूर्ण घर मिळण्याची अपेक्षा आहे. दिल्लीत बऱ्याच काळानंतर कसोटी सामना खेळला जात असल्याने खूप उत्सुकता आहे.' असे डीडीसीएचे सहसचिव राजन मनचंदा यांनी मंगळवारी पीटीआयला सांगितले.**

# कौशल्या पवारची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो -खो स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठ संघात निवड

। नाशिक । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



क्रीडा क्षेत्राच्या इतिहासात तब्बल २२ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नाशिकमधील कौशल्या पवार या खेळाडूची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो -खो स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. कौसल्या ही केटीएचएम महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला खो -खो स्पर्धा पंजाब येथे १५ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहेत. स्पर्धेत नाशिकच्या खेळाडूला स्थान मिळाले आहे. राष्ट्रीय सुवर्ण पदक विजेत्या कौशल्याला स्पोर्ट्स कोट्यातून प्रवेश दिला आहे.

कौसल्या पवार ही 'संस्कृती' नाशिकची खेळाडू आहे. तिला गीतांजली सावळे आणि उमेश आटवणे यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठ संघात निवड होणारी कौसल्या ही खो -खो प्रबोधिनीची पहिली खेळाडू ठरली आहे.

जिल्हा खो -खो असोसिएशन आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय संचालित छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथील खो -खो प्रशिक्षण केंद्रात ती नियमित सराव करते. तिच्या यशाबद्दल जिल्हा खो -खो असोसिएशनचे अध्यक्ष विश्वास ठाकूर, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, आजीवन अध्यक्ष रमेश भोसले, कार्याध्यक्ष आनंद गारंमपल्ली, खजिनदार सुनील गायकवाड आदींनी तिचे अभिनंदन केले.